महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ ०५ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १६० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये




लक्षवेधी

## दत्तजयंतीनिमित्त ठाण्यातील प्राचीन मंदिरात भाविकांची गर्दी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दत्त जयंतीनिमित्त ठाण्यातील दमानी इस्टेट परिसरातील प्राचीन दत्त मंदिरात भाविकांना दर्शनासाठी गर्दी केली होती. हे मंदिर ११३ वर्षे प्राचीन असून मंदिरात पूजन, महाआरती, भक्तीसंगीत आणि विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. ठाणे शहरात कौपिनेश्वर मंदिरासह विविध प्राचीन मंदिरे आढळून येतात. या मंदिरांमध्येच १९१२ साली विठ्ठल सायन यांनी उभारलेल्या दत्तमंदिराचा समावेश होतो. हे मंदिर ठाण्यातील दमानी इस्टेट परिसरात असून हे ११३ वर्षे जुने आहे. या मंदिरात मोठ्या प्रमाणावर भाविक येत असतात. दरवर्षी दत्त जयंतीनिमित्त मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होत असते. यंदाही ही परंपरा कायम असल्याचे दिसून आले. मंदिरात परिसरातील नागरिकांसह विविध भागांतून सकाळपासूनच भाविक दर्शनासाठी दाखल झाले होते. मंदिरात पूजन, महाआरती, भक्तीसंगीत आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे मंदिर व्यवस्थापनाच्यावतीने आयोजन करण्यात आले होते. तसेच मंदिर परिसरात दिवे, फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. मंदिर व्यवस्थापन समिती आणि स्वयंसेवकांनी दर्शनाची सुयोग्य व्यवस्था केली होती. धार्मिक परंपरा जपणारे हे ठाण्यातील एक जुने आणि श्रद्धास्थान असलेले मंदिर असून, दत्त जयंती हा येथील प्रमुख उत्सव मानला जातो. त्याचप्रमाणे शहरातील इतर भागातील मंदिरातही दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. तसेच विविध धार्मिक कार्यक्रम देखील पार पडले. तर, अनेकठिकाणी पारायणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. दरम्यान, शहरात मोठ्या उत्साहात दत्तजयंतीचा उत्सव साजरा करण्यात आला.

## मध्य रेल्वेकडून स्थानकांच्या नावात अक्षम्य चुका !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मध्य रेल्वेच्या ट्रान्स हार्बर मार्गावरील अनेक स्थानकांच्या मराठी नावात मध्य रेल्वेकडूनच चुका झाल्याचे दिसून येत आहे. लोकलच्या डब्यातील टिकरवर (एलईडी डिसप्ले बोर्ड) दिलेल्या स्थानकांच्या मराठी नावांची हास्यास्पद रूपे बघून प्रवाशांचे मनोरंजन होत आहे, त्यापेक्षाही मध्य रेल्वेच्या भाषिक उदासिनता समोर आली आहे. रेल्वेच्या युटीएस ॲपवरही मूळ नावांऐवजी वेगळीच नावे दिसत असल्याने प्रवाशांचा अनेकदा गोंधळ होतो. रेल्वे स्थानकांच्या नावातील चुका तात्काळ सुधारण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे. रबाळे स्थानकाचे नाव थेट रबाडा, कोपरखैरणे स्थानकाचे नाव कोपरखैरणा तर दिवा-वसई मार्गावरील जूचंद्र स्थानकाचे नाव जुईचंद्र असे झाले आहे. या फक्त व्याकरणाच्या चुका नसून थेट स्थानकांची नावेच बदलली गेल्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा गोंधळ.

## अत्याधुनिक पध्दतीने शिवमंदिर स्मशानभुमीचे सुशोभिकरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - पडझड झालेल्या डोंबिवली पूर्व भागातील शिवमंदिर रस्त्यावरील शिवमंदिर स्मशानभुमीचे अत्याधुनिक पध्दतीने सुशोभिकरण आणि उभारणी करण्याचा निर्णय कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने घेतला आहे. ही स्मशानभूमी पूर्णपणे पाडून त्या ठिकाणी पाच कोटी ७४ लाख रूपये खर्च करून अत्याधुनिक पध्दतीची स्मशानभूमी उभारण्यात येणार आहे.

डोंबिवली पूर्व शहराच्या मध्यवर्ति ठिकाणी शिवमंदिर स्मशानभूमी आहे. मागील अनेक वर्षापासून असलेल्या या स्मशानभुमीची देखभाल काही सामाजिक संस्था करत होत्या. त्यामुळे स्मशानभूमीत नियमित स्वच्छता केली जात होती. स्मशानभूमीच्या आवारात विविध जातीची शोभिवंत झाडे लावण्यात आली होती. नागरिकांना बसण्यासाठी प्रेक्षक दालन होते. लाकडांसाठी स्वतंत्र बंदिस्त व्यवस्था होती. स्वच्छता गृह, पाण्याची व्यवस्था नियोजनपूर्ण होती. दरम्यानच्या काळात सामाजिक संस्थेने आपले काम बंद केले. तेव्हापासून शिवममंदिर स्मशानभूमीची दुरावस्था झाली.

> शिवमंदिर स्मशानभूमी ही डोंबिवली शहराच्या मध्यवर्ति ठिकाणची स्मशानभूमी आहे. जुन्या झालेल्या या स्मशानभूमीची पडझड झाल्याने या स्मशानभूमीचे सुशोभिकरण केले जात आहे. नागरिकांनी या कामासाठी सहकार्य केले तर हे काम लवकर पूर्ण होईल. अत्याधुनिक पध्दतीची स्मशानभूमी नागरिकांना उपलब्ध होईल.
>
> **मनोज सांगळे, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग.**

## अंबरनाथ : नगरपरिषद निवडणूक पार्श्वभुमीवर

# भाजपची जाहीर सभा व कार्यकर्ता संवाद मेळावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः आज देशात आणि राज्यात रेल्वेची अनेक कामे आपल्याला पूर्ण झालेली पाहायला मिळतात. कारण देशाचे रेल्वेमंत्री शिक्षित आहेत. योग्य व्यक्ती योग्य ठिकाणी बसला तर योग्य कामे होतात. त्यामुळे योग्य व्यक्तीला योग्य ठिकाणी बसवा, असे आवाहन करताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी अंबरनाथमध्ये केले. यावेळी त्यांनी एका चित्रपटातील प्रसंग सांगत अंबरनाथमधील लोक मतदान करायला घाबरतात. कारण समोर तशी लोक आहेत, असे सांगत त्यांनी शिंदेंच्या शिवसेनेवर अप्रत्यक्ष टीका केली.**

राज्यात शिंदेंच्या शिवसेनेतील पदाधिकारी आणि माजी नगरसेवक फोडण्यावरून रंगलेल्या वादानंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आपला मोर्चा शिंदेंच्या शिवसेनेचे वर्चस्व असलेल्या नगर परिषदा, महापालिकांकडे वळवला आहे. काही दिवसांपूर्वी त्यांनी कल्याण डोंबिवली महापालिकेतील शिंदेच्या शिवसेनेतील पदाधिकारी फोडत असताना येथे भाजपचा झेंडा फडकेल अशी घोषणा केली होती. त्यांनंतर त्यांनी अंबरनाथ नगर परिषदेकडे आपला मोर्चा वळवला. शिंदेंच्या शिवसेनेचे या नगर परिषदेवर वर्चस्व आहे. स्थानिक खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे अनेक महत्वाचे प्रकल्प या शहरात आहेत. त्यात प्रचारात मागे



पडलेल्या भाजपला येथील निवडणूक पुढे ढकलली गेल्याने प्रचारासाठी आणखी वेळ उपलब्ध झाला आहे.

त्याच पार्श्वभूमीवर रविंद्र चव्हाण यांनी नुकतीच अंबरनाथमध्ये एक सभा घेतली. या सभेत बोलताना त्यांनी शिंदेंच्या शिवसेनेवर अप्रत्यक्ष टीका केली. यावेळी त्यांनी एक प्रसंगही सांगितला. अंबरनाथ शहरातील लोक मतदानाला घाबरतात.

असाच एक प्रसंग एक चित्रपटात आहे. ज्यात दहशतीच्या वातावरणात १०० मीटरची रेघ ओलांडून एक ज्येष्ठ व्यक्ती काठी टेकत मतदान करायला जाते आणि मतदान करते. त्या चित्रपटाची फीत काढून मतदारांना दाखवा. इथे लोक मतदानाला घाबरतात कारण समोरची लोक तशी आहेत, असे म्हणत चव्हाण यांनी शिंदेंच्या उमेदवारांवर टीका केली.

यावेळी त्यांनी सुशिक्षित उमेदवाराला निवडून देण्याचे आवाहनही त्यांनी केले. शिकलेला माणून योग्य ठिकाणी असला की योग्य कामे होतात. देशात रेल्वेचे पूर्ण होणारे प्रकल्प हे शिक्षित माणून अर्थात अश्विनी वैष्णव तिथे असल्याने होत आहेत. त्यामुळे इथेही शिक्षित माणसाला निवडून द्या, असे आवाहन त्यांनी केले.

अंबरनाथ शहरात भाजपच्या वतीने भयमुक्त आणि भ्रष्टाचारमुक्त अंबरनाथची हाक देत प्रचार केला जातो आहे. भाजपच्या प्रचारात शिंदेंच्या शिवसेनेवर टीका करत असताना भयमुक्त वातावरण बदलण्याच्या घोषणा केल्या जातात. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनीही आपल्या भाषणात याच मुद्द्यावर भाष्य केल्याने भाजपने भयमुक्त अंबरनाथची घोषणा प्रचारात कायम ठेवल्याचे स्पष्ट झाले आहे.



# काल्हेर मधील कापड गोदामाला भीषण आग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** भिवंडी येथील काल्हेर भागातील एका कापड गोदामाला गुरुवारी मध्यरात्री भीषण आग लागली. या आगीत कोणीही जखमी झाले नसले तरी आर्थिक नुकासन मोठ्याप्रमाणात झाल्याचे कळते आहे. सुमारे दोन तासानंतर आगीवर नियंत्रण मिळविणे अग्निशमन दलाला शक्य झाले. काल्हेर येथील जय माता दी कॉम्प्लेक्स भागात कापड गोदाम आहे. गुरुवारी मध्यरात्री १२.४५ वाजताच्या सुमारास येथील कापड गोदामाला अचानक आग लागली. घटनेची माहिती माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर भिवंडी अग्निशाम दलाचे जवान आणि ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाचे जवान घटना स्थळी दाखल झाले. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. परंतु आग भीषण असल्याने धुराचे लोट मोठ्याप्रमाणात पसरले होते. त्यामुळे प्रदूषण वाढले. या भागात काही ठिकाणी नागरी वस्ती आहे. त्यामुळे नागरिकांमध्येही भितीचे वातावरण होते. घटनेत कापड गोदामातील साहित्य जळून खाक झाले. त्यामुळे आर्थिक नुकसान झाल्याचे कळत आहे. या आगीवर सुमारे दोन तासांच्या प्रयत्नानंतर नियंत्रण मिळविणे शक्य झाले.

# आजपासून कुळगाव-बदलापूरचे नगर भू- अभिलेखन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूमी संसाधन विभागामार्फत नक्शा हा पथदर्शी प्रकल्प राबिवला जात आहे. त्यामध्ये कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेची निवड करण्यात आली असून त्यामध्ये नगरपरिषद हद्दीतील मौजे एरंजाड, सोनिवली, कुळगाव, बदलापूर, जोवेली, वालिवली, कात्रप, शिरगाव, मांजर्ली, खरवई, माणकिवली, बेलवली या 12 गावांची निवड करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे मिळकतीचे नकाशान्वये सीमा निश्चित होऊन भविष्यातील वाद निर्माण होणार नाही, यासाठी उपाययोजना केली जाणार आहे. या नक्शा प्रकल्पाच्या अंतर्गत निवड करण्यात आलेल्या 12 गावामधील नगर भूमापन अभिलेख तयार करण्याकरिता चौकशी अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली असून त्यानुसार मिळकतीची चौकशी करणे, नवीन मिळकत पत्रिका बनविणे, मिळकतीला नवीन नगर भूमापन क्रमांक देणे इत्यादी कामे करण्यात येणार आहेत. या योजनेमुळे नागरिकांना मालकी हक्क पुरावा प्राप्त होणार असून मालमत्तेबाबत पारदर्शकता निर्माण होऊन मिळकतीचे नकाशान्वये सीमा निश्चित होऊन भविष्यातील वाद निर्माण होणार नाही. नागरी हक्काचे संरक्षण होऊन नागरिकांना कर्ज सुविधा मिळणे सुलभ होणार आहे. या योजनेची सुरुवात 5 डिसेंबर रोजी मौजे जोवेली तालुका-अंबरनाथ जिल्हा-ठाणे येथून चौकशी कामाची सुरुवात नेमलेले चौकशी अधिकारी करणार असून नागरिकांची सजग होऊन सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.







## ठाणे मनोरुग्णालयाच्या

# इतिहासाचे जतन

### पुरातत्त्व विभागाच्या मदतीने रुग्णालय प्रशासनाकडून हालचाली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे / ता. ४ :** ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाचा कायापालट होणार असून, जुन्या इमारती पाडून नव्या टोलेजंग इमारती बांधल्या जाणार आहेत, मात्र हे काम करत असताना १२५ वर्षांच्या ऐतिहासिक ठेव्याची भावी पिढीला माहिती व्हावी याकरिता तो जतन करावा, अशी मागणी जनमानसातून होऊ लागली आहे. रुग्णालयातील बांधकाम पाडत असताना काही पुरातन मूर्तदिखील आढळल्या असल्याने त्यांचेही येथे विशेष काळजी घेऊन जतन करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने रुग्णालय प्रशासनाकडून सकारात्मक पाऊल उचलले जाणार आहे.

ठाणे आणि मुंबईच्या वेशीवर प्रादेशिक मनोरुग्णालय सुरू आहे. देशभरातील रुग्णांचा येथे उपचार होतो. सुमारे ७५ एकर जागेत वसलेले हे रुग्णालय १९०१ मध्ये बांधण्यात आले होते. रुग्णालयाची काही जागा रेल्वे आणि मेट्रोला देण्याचे नियोजित असल्यामुळे या ठिकाणी मनोरुग्णालयाची नव्या इमारती बांधण्यात येणार आहेत. जुन्या दुमजली इमारती पाडून या ठिकाणी १२ हजार चौरस मीटर बांधकाम केले जाणार आहे. नव्या बांधकामात तीन हजार २७८ खाटांची क्षमता असणार आहे. नव्या रुग्णालयाला शासनाकडून मंजुरी मिळाली असून, लागणारा निधीदेखील मंजूर झाला आहे. त्यामुळे जुनी बांधकामे पाडून सपाटीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे, मात्र येथील सर्व जुनी कामे पाडून टाकल्यास ऐतिहासिक खाणाखुणा मिटण्याची शक्यता निर्माण झाल्याने इतिहासप्रेमींनी रुग्णालयाच्या नव्या बांधकामात हा ठेवा जतन करण्याची मागणी केली आहे. काही दिवसांपूर्वीच येथील एका बंगल्यात आणि खोदकाम करताना जुन्या मूर्ती आढळून आल्या. त्यामुळे या परिसरात आणखी पुरातन वास्तू मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही बाब विचारात घेऊन रुग्णालय प्रशासनाने येथील ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याकरिता सकारात्मक पाऊल उचलले आहे. पुरातत्त्व खात्याशी संपर्क साधून या ठिकाणी पाठवलेल्या जुन्या वास्तू एका ठिकाणी जतन करून त्यांचे प्रदर्शन करता येईल का, असादेखील विचार केला जात असल्याचे समजते. काही दिवसांपूर्वीच येथे पुण्याहून पुरातत्त्व विभागाचे अधिकारी येऊन गेले असून, लवकरच मुंबईतील पुरातत्त्व विभागाचे अधिकारदेखील येणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

# गटविकास अधिकारी अटकेचा जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांकडून निषेध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. ४ :** आर्वी पंचायत समितीतील मनरेगा योजनेंतील कथित अपहारप्रकरणात गटविकास अधिकारी यांना वरिष्ठांची परवानगी न घेता थेट केलेल्या अटकेविरोधात महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटना यांच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला. याप्रकरणी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी यांच्याकडे निवेदन देत विविध समस्यांचा पाढा वाचला.

मनरेगा, घरकुल किंवा इतर योजनांतील अनियमिततेच्या प्रथमदर्शनी संशयावर थेट गुन्हा दाखल न करता आधी विभागीय चौकशी करावी, कोणत्याही गैरव्यवहाराच्या तपासणीपूर्वी सरकारची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करावे, गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे व त्या काळातील संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ प्रशासकीय व कायदेशीर संरक्षण द्यावे, तांत्रिक त्रुटींवर आधारित डीएससी वापरासाठी अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्याची पद्धत थांबवावी, डीएससी वापर, जबाबदाऱ्या आणि संरक्षणाविषयी सुधारित, स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे राज्यभर लागू करावीत आदी मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेचे उप मुख्य कार्यकरी अधिकारी प्रमोद काळे, अविनाश फडतरे, छायादेवी शिसोदे आदींनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दिले.

दरम्यान, महिला अधिकारी असल्याने आवश्यक असलेल्या कायदेशीर संरक्षणाची पायमल्ली झाली असून, कोणत्याही विभागीय तपासणीविना रात्री उशिरा अटकेची कारवाई करण्यात आली. न्यायालयाने मरसकोल्हे यांना गुरुवार (ता. ४) पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या संपूर्ण घटनेमुळे राज्यभरातील गटविकास अधिकाऱ्यांमध्ये गंभीर असुरक्षितता निर्माण झाली आहे.

# शाळा बंद आंदोलनास शिक्षक संघटनांचा पाठिंबा



## शिक्षक, शिक्षक संघटना आंदोलनास ठाम

### आंदोलनात सहभागी शिक्षकांचे कापले जाणार एक दिवसाचे वेतन, शिक्षण विभागाचा आदेश जारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : राज्यातील शिक्षक बांधवांच्या हक्कासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने शुक्रवार दि. 5 डिसेंबर 2025 रोजी शाळा बंद आंदोलनाला महाराष्ट्र राज्य शिव छत्रपती शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना, महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटना, मुंबई मुख्याध्यापक संघटनेने जाहीर पाठिंबा दिला आहे.

या निर्णयामुळे मुंबई ठाण्यातील शाळा उद्या बंद असणार आहेत. उद्या मुंबई मुख्याध्यापक संघटनेच्यावतीने मुंबई विभाग शिक्षण उपसंचालकांना निवेदन देण्यात येणार असल्याचे मुंबई मुख्याध्यापक संघटनेचे उत्तर विभाग अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी सांगितले.

या आंदोलणात सरसकट सर्व शिक्षकांसाठी TET उत्तीर्ण होण्याची घातलेली अट रद्द करणे, 15 मार्च 2024 चा अन्यायकारक शासननिर्णय रद्द करणे, 1 नोव्हेंबर 2005 नंतर नियुक्त सर्व विभागातील शिक्षकांना जुनी पेंशन योजनालागू करणे, शिक्षकांना 10-20-30 वर्षाची आश्वासीत प्रगती योजना लागू करणे, शिक्षणसेवक पद रद्द करून सुरुवातीपासून शिक्षकांची कायमस्वरूपी नेमणूक करणे या सह अन्य मागण्यांचा समावेश असणार असल्याचे अनिल बोरनारे यांनी सांगितले. या आंदोलनात संस्थाचालक संघटना तसेच इतर सर्व संघटना सहभागी होणार आहेत

# युवतींना सुरक्षित आणि स्वावलंबी बनवण्यासाठी ‘शौर्य जागृती प्रशिक्षण शिबीर’

सध्याच्या काळात समाजातील असुरक्षितता, गुन्हेगारी प्रवृत्ती, रस्त्यावर होणारी छेडछाड, गुंडांकडून होणारा त्रास, सायबर-छळ इत्यादी घटनांमुळे युवतींच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनलेला आहे. प्रत्येक मुलगी सुरक्षित, आत्मविश्वासपूर्ण आणि स्वावलंबी असावी, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. याच उद्देशाने हिंदु जनजागृती समिती, सव्यसाची गुरुकुलम् आणि भागीरथी महिला संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ७ डिसेंबर २०२५ या दिवशी पद्माराजे गर्ल्स हायस्कूल, खरी कॉर्नरजवळ, कोल्हापूर येथे नि:शुल्क ‘शौर्य जागृती प्रशिक्षण शिबिर’ आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारचे शिबिर होत आहे. १ हजारपेक्षा अधिक युवतींना यात विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येणार असून त्यासाठी १०० हून अधिक प्रशिक्षक सहभागी आहेत. या शिबिरात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रात कार्यरत नामांकित आणि तज्ञ महिला मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेसाठी ‘सव्यसाची गुरुकुलम्’चे प्रधान आचार्य श्री. लखन जाधव, सनातन संस्थेच्या सद्गुरु स्वाती खाडये, ‘आंतरराष्ट्रीय आर्यनमॅन’ सौ. माहेश्वरी सरनोबत, उद्योजक श्री. नितीन वाडीकर आणि सौ. मनिषा वाडीकर, तसेच हिंदु जनजागृती समितीचे श्री. शिवानंद स्वामी, श्री. महेंद्र अहिरे उपस्थित होते.

श्री. सुनील घनवट पुढे म्हणाले, “हे शिबिर भागिरथी महिला संस्था आणि सव्यसाची गुरुकुलम यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येत आहे. केंद्र सरकारने संसदेत सादर केलेल्या एन.सी.आर.बी. (नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या) अहवालानुसार देशभरात गेल्या ३ वर्षांत १० लाख मुली बेपत्ता होऊनही, यातील सर्वांत जास्त मुली महाराष्ट्रातून गायब होत आहेत. त्यामुळे या युवती-महिला यांच्या रक्षणासाठी पुढाकार घेऊन ठोस कृती करणे अपेक्षित आहे. या शिबिरात समाजात घडणाऱ्या विविध कठीण प्रसंगांमध्ये युवती-महिलांनी स्वत:चा बचाव कसा करावा, यांविषयीची प्रात्यक्षिके हिंदु जनजागृती समितीच्या वतीने करून दाखवली जाणार आहेत. अशा प्रकारचे प्रशिक्षण हे काळाची आवश्यकता असून महाराष्ट्र स्तरावर प्रथमच अशा प्रकारचे विनामूल्य प्रशिक्षण होत आहे. या शिबिरात हिंदु जनजागृती समितीच्या वतीने ७ डिसेंबरला सकाळी १० वाजल्यापासून पद्माराजे गर्ल्स हायस्कूलच्या गडकरी सभागृहात क्रांतीकारकांचे फ्लेक्स प्रदर्शनही लावण्यात येणार आहे. याच समवेत ८ डिसेंबरला सकाळी ८ सायंकाळी ५ पर्यंत केवळ शालेय विद्यार्थ्यांसाठी हे प्रदर्शन खुले असेल !”




श्री. लखन जाधव म्हणाले, “या शिबिरात आमच्या गुरुकुलातील विशेष प्रशिक्षक महिला-युवती यांना मार्गदर्शन करणार आहेत. या ठिकाणी गुरुकुलम वतीने ऐतिहासिक, दुर्मिळ शिवकालीन शस्त्रास्त्रांचे विशेष प्रदर्शन येथे लावण्यात येणार आहे. यात ढाल, तलवार, भाला, जांभिया, कट्यार यासंह अनेक शस्त्रे पहाण्यास मिळतील. हे प्रदर्शन पाहून आपल्या जाज्वल्य इतिहासाचे स्मरण होण्यास साहाय्य होईल.”

सद्गुरु स्वाती खाडये म्हणाल्या, “शिवप्रतापदिनाचे औचित्य साधून होत असलेल्या या शिबिरासाठी १ सहस्रहून अधिक युवतींची नोंदणी पूर्ण झाली आहे. या शिबिरात युवतींना कराटे आणि लाठीकाठीचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. नोंदणी झालेल्या युवती-महिला यांना या शिबिरात सहभागी होता येणार आहे. यात सहभागी प्रत्येक युवतीला प्रशास्तीपत्रक देण्यात येणार आहे. स्वरक्षणासमवेत आत्मबल कसे वाढवावे याचेही विशेष मार्गदर्शन यात करण्यात येणार आहे.”

## १ हजारपेक्षा अधिक युवतींना विनामूल्य प्रशिक्षण !

श्री. शिवानंद स्वामी म्हणाले, “या कार्यक्रमात ऑलिम्पिक विजेत्या ‘आंतरराष्ट्रीय नेमबाज’ तेजस्विनी सावंत, दोन वेळेस छत्रपती पुरस्कार विजेत्या ‘आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टर’ स्नेहांकीता वरुटे, ‘आंतरराष्ट्रीय आर्यनमॅन’ सौ. माहेश्वरी सरनोबत, कोल्हापूर येथील पोलीस उपअधीक्षक प्रिया पाटील, सनातन संस्थेच्या संत सद्गुरु स्वाती खाडये, तसेच ‘ए.बी.पी. माझा’च्या कार्यकारी संपादिका सरिता कौशिक यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. अधिक माहितीसाठी 70207 10460 या क्रमांकावर संपर्क साधावा.”

‘शौर्य जागृती प्रशिक्षण शिबिराची वैशिष्ट्ये : युवतींना कराटे आणि लाठी-काठी प्रशिक्षण, * शिवकालीन युद्धकलेची प्रात्यक्षिके, विशेष प्रथमोपचार पथक, ७ डिसेंबला सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत शिवकालीन शस्रप्रदर्शन, तसेच ८ डिसेंबरला सकाळी ८ सायंकाळी ५ पर्यंत शालेय विद्यार्थ्यांसाठी हे प्रदर्शन खुले असेल, संकटसमयी सोप्या बचावांच्या सोप्या पद्धतीची प्रात्यक्षिके, तज्ञ महिला मान्यवरांचे मागदर्शन आणि सहभागी युवतींना प्रशिस्तपत्रक वाटप केले जाईल.

# आयडॉल शिक्षकांचे माध्यमातून मिळणार दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे धडे

## ठाणे जिल्ह्यातील 15 शिक्षक ठरले 'आयडॉल' शिक्षक

### राज्यस्तरीय कार्यशाळेस आयडॉल शिक्षकांनी ठाणे जिल्ह्याचे केले प्रतिनिधीत्व

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : शालेय शिक्षणात गुणवत्तापूर्ण आणि आनंददायी शिक्षणाचे ध्येय साध्य करण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांचे संकल्पनेतून आता राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या माध्यमातून शिक्षकांची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी राज्यभरातून विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी संपूर्ण आयुष्य शाळा व विद्यार्थी विकासाकरीता योगदान देणाऱ्या शिक्षकांच्या अनुभवाचा उपयोग राज्यातील अन्य शाळांना, शिक्षकांना, विद्यार्थ्यांना व पालकांना होण्यासाठी तसेच शिक्षकांना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने अशा शिक्षकांच्या कामाचा गौरव व सन्मान करण्यासाठी विशेष मोहिम शासनाने 'एससीईआरटी'च्या माध्यमातून हाती घेतलेली आहे. या उपक्रमशील आदर्श शिक्षकांची निवड करत त्यांना 'आयडॉल' म्हणून सन्मानित करण्यात येणार आहे. त्यासाठी या शिक्षकांचे एकदिवसीय राज्यस्तरीय प्रशिक्षण दि.4 डिसेंबर 2025 रोजी तापडिया नाट्यमंदिर, छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आले



होते. हेच शिक्षक आपापल्या जिल्ह्यांमध्ये इतर शाळा व शिक्षकांसाठी कार्यशाळा घेणार आहेत.

ठाणे जिल्ह्यतून या उपक्रमासाठी अंबरनाथ, कल्याण डोंबिवली मनपा, मुरबाड, कल्याण, शहापूर, मीरा भाईंदर मनपा, ठाणे मनपा URC - 1, URC - 2 नवी मुंबई येथील 15 शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. अशा उत्तम आणि प्रयोगशील शिक्षकांची निवड करण्यासाठी एससीईआरटीने तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर समित्या नेमल्या होत्या. त्यातून सुमारे ४६० शिक्षकांची निवड राज्यभरातून झाल्याचे समजते. या उपक्रमात मुंबईतील ३६ शिक्षकांची निवड झाली आहे.

नवी मुंबईतुन आय इ एस नवी मुंबई हायस्कुलचे राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक मनोज महाजन यांनी शासनाने माझी ऑयडॉल शिक्षक म्हणून निवड केली आहे. ती सार्थ ठरवणार असे सांगितले

**कोकण ही निसर्गाची रंगभूमी आहे असं म्हणतात. कोकणच्या मातीला लोककलेचा सुगंध आहे, हे त्रिवार सत्य. परंतु आधुनिकतेच्या वादळात ही लोककला कुठेतरी लोप पावत चालली आहे. कोकणचा भूमिपुत्र मुंबईचा चाकरमानी झाल्याने या लोककलेचा वारसा पुढे कसा जाणार? अशी चिंता सध्या कोकणकरांना वाटत आहे. जाखडी नृत्य, दशावतार, नमन ह्या गोष्टी पाहताना आणि त्यांचा आनंद घेताना वरवर सोप्या आणि सहज वाटतात परंतु त्या प्रत्यक्षात स्टेजपर्यंत आणण्यासाठी आयोजकाला किती आणि कशी कसरत करावी लागते शिवाय त्यासाठी कशा पद्धतीचं नियोजन असावं लागतं याचं वास्तव दाखवणारी नाट्यकलाकृती म्हणजे "अचाट नगरचा विवाह सोहळा." सृजन प्रतिष्ठान वाशिंद प्रस्तुत सागर डावल लिखित आणि दिग्दर्शित हे धम्माल विनोदी लोकनाट्य राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने आयोजित केलेल्या ६४ व्या हौशी नाट्य स्पर्धेत ३ डिसेबर रोजी आचार्य अत्रे रंगमंदिर या केंद्रात सादर झालं. ! त्याचं हे सविस्तर विश्लेशण !**

### कोकणकला जपण्यासाठीची धडपड...

# अचाट नगरचा विवाह सोहळा



कोकणचे खेळे अर्थात बहुरंगी नमन अशा या लोककलेच्या प्रकारात प्रामुख्याने संगीत , नृत्य शक्ति-तुरा , वगनाट्य यांचा समावेश होतो. परंपरागत चालत आलेल्या या खेळयांच्या प्रवासाची सुरुवात होळीच्या दरम्यान ग्रामदैवताच्या सहाणेवर पहिली मानाची थाप मारूनच होते. पायघोळ झगे , उपरणी , डोक्यावर पगड्या, अंगावर रंगीबेरंगी शाली अन हातात टाळ हा खेळयांचा मूळ पोषाख. होळी आणि गणेशोत्सव यांसारख्या सणांदरम्यान या लोककला सादर केल्या जातात, ज्या कोकणच्या समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि परंपरेचे प्रतीक आहेत. अशीच एक पारंपारिक लोककला (नमन) सादर करण्यासाठी आणि त्यातील पात्रांचं नियोजन करण्याकरता चावडीवरील बैठक बसते. त्या बैठकीत शहरवासी - गावकरी असा छोटासा वाद होतो काहींचा सभात्याग होतो.

काहीही झालं तरी कोकणची संस्कृती जपण्यासाठी नमन हे करावंच लागणार असा निर्णय सभेत घेण्यात येतो .... इथून सुरू होणारं या नाटकाचं कथानक कोकणच्या नाट्यसंस्कृतीला लागलेल्या ग्रहणापर्यंत जाते आणि तिचे आत्ताचे वास्तव लोकांसमोर घेऊन येते. 'नाना' हे या कथेतील मुख्य पात्र सर्व पात्रांना धरून आहे. एखादी लोककला लोकांसमोर आणण्यासाठी किती धडपड करावी लागते आणि कशा पद्धतीने कलाकारांची मनधरणी करावी लागते याच मूर्तीमंत उदाहरण म्हणजे ही कलाकृती. आणि तिच्यातील नायक "नानानू" !

ठरल्याप्रमाणे होऊ घातलेल्या नाट्यात उत्तम रोल मिळावा यासाठी गावकऱ्यांची चढाओढ , महिलेचे पात्र करण्यासाठी सगळ्यांचा नकार आणि शेवटी कसं बसं कुणाला तरी राजकन्येच्या रोलसाठी तयार केले जाणं. आणि सगळ्या कलाकारांना स्टेजवर आणणं यासाठी नानांनी केलेली धडपड खूपच हृदयस्पर्शी होती. दोन दिवसांच्या अवधीत प्रॅक्टिस करणं आणि ती स्टेजवर सादर करणे त्यासाठी कलाकारांकडून तालीम करून घेणं यात नानांची कशी दमछाक होते हे बघणं हा या नाटकातील विनोदी भाग आहे. असे असलं तरी लोककला टिकवण्यासाठी कोकणातल्या प्रत्येक गावात एक तरी नाना असतोच त्याच नानाचं जिवंत रूप रंगमंचावर दाखवण्यासाठी लेखकांनी केलेला प्रयत्न खूपच चांगला आणि प्रामाणिक होता.

जोरजबरदस्तीने डायलॉग उरकून एक्झिट घेणे अशी नमनातील अनेक नवख्या कलाकारांची मानसिकता असते ती मानसिकता देखील नानांना सांभाळावी लागते या नाटकात अचाट नगरच्या राजाची झालेली एन्ट्री काहीशी अशीच होती बेवडा राजपुत्र आणि नको असतानाही राजकन्येचा रोल करणाऱ्या तरुणांच्या भूमिकेमुळे नाटकात हास्याच्या उकळया फुटल्या होत्या.

**संस्था :**
**सृजन प्रतिष्ठान वाशिंद**

**लेखक / दिग्दर्शक**
**सागर बबन डावल**

**नेपथ्य - बळीवंश कलामंच**

- **संगीत : विलास मोरे/ समीर म्हसकर**
- **संगीत संयोजन : ऋषिकेश कटके**
- **प्रकाशव्यवस्था : सागर सुरेश पवार**
- **वेशभूषा : उमेश आलिम /दीपक गोरीवले**
- **रंगभूषा : अरविंद**

प्रत्येक पात्राने नमन नाट्यात सामील होण्यासाठी घातलेल्या अटी आणि त्या अटींच्या आधाराने हास्य विनोद करत पुढे सरकणारे विनोदी कथानक म्हणजे अचाट नगरचा विवाह सोहळा.

कोकण - अडकित्ता आणि सुपारी असे तिहेरी नातं आहे, किंबहुना अडकित्ता आणि सुपारी शिवाय कट्टर कोकणी माणसाची भूमिका (त्यातल्या त्यात नानांची भूमिका) रंगमंचावर सादर करता येणे अशक्यच! किंबहुना हेच जाणून नानांच्या हाती दिलेला अडकित्ता जख्खड कोकणी माणसाची आठवण करून द्यायला पुरेसा आहे.

अचाट नगरच्या विवाह सोहळयात राजकन्येचा विवाह खरे तर राजपुत्राशी होणार असतो परंतु ती राजकन्या शिपायाच्या प्रेमात आणि शिपाई राजकन्येकडे असलेल्या मटणाच्या मोहात कसा पडतो? हा विनोदी प्रसंग या नाटकात प्रेक्षकांना अनुभवायला मिळेल. गावातील स्टेजवर सादर होणाऱ्या वगनाट्यातील पात्रे आपल्या नाटकी भूमिका सोडून वैयक्तिक भूमिकांमध्ये कशी जातात याचं विनोदी सादरीकरण सागर डावल यांनी आपल्या या कलाकृतीतून केले. सरते शेवटी गावातील मास्तरांनी व्यक्त करून मांडलेल्या विचारात कोकणचा भूमिपुत्र कोकणाला पारखा होतोय याची जाणीव करून दिली. स्थानिक लोक शहराकडे गेली गावाकडची नाळ तुटली आणि त्याचा कुठेतरी लोककलेवर देखील परिणाम होतोय हे मास्तरांनी आपल्या मनोगतातून पटवून दिलं आहे. कोकणातील लोकसंस्कृती जपण्यासाठी सृजन नाट्य संस्थेने सादर केलेली ही कृती सर्वांना लोककलांच्या संवर्धनावर आचार आणि विचार करायला भाग पाडते.

**आजची तरुण पिढी आधुनिक शिक्षण आणि रोजगाराच्या संधींसाठी शहरांकडे वळत आहे. त्यामुळे गावाकडील पारंपरिक कला शिकण्यात किंवा त्या सादर करण्यात त्यांना फारसा रस वाटत नाही. शिवाय आर्थिक पाठबळाचा अभाव हे सुद्धा कोकणातील लोककलेला लागलेल्या घरघरचे मुख्य कारण आहे. आधुनिकीकरणाच्या वादळात लोककला सादरीकरण हे उपजीविकेचे शाश्वत साधन राहिलेले नाही. कलाकारांना मिळणारे मानधन आणि वर्षभर मिळणारे काम अपुरे असते, ज्यामुळे नवीन कलाकार या क्षेत्रात येण्यास कचरतात. नाटक, सिनेमा, इंटरनेट आणि सोशल मीडिया यामुळे लोकांची करमणुकीची व्याख्या बदलली आहे. दशावतार, जाखडी यांसारखे कार्यक्रम पाहणाऱ्यांची संख्या कमी होत आहे. जरी काही योजना असल्या तरी, पारंपरिक कला आणि कलाकारांना मिळणारे शासकीय पाठबळ आणि प्रोत्साहन पुरेसे नाही, अशी कलाकारांची तक्रार असते. कलाकार आणि त्यांचे कुटुंबे रोजगारासाठी मुंबई किंवा पुण्यासारख्या शहरांमध्ये स्थलांतरित झाल्यामुळे गावाकडील मूळ कला मंडळे कमकुवत झाली आहेत. असं असतानाही कोकणच्या मातीतील हि हळवी लोककला जतनासाठी आणि आधुनिकीकरणामुळे तिच्यावर झालेल्या जखमांवर फुंकर घालण्याचा प्रयत्न म्हणजे अचाट नगरचा विवाह सोहळा. निराशाजनक असलं तरीही, परिस्थिती अद्याप पूर्णपणे निराशाजनक नाही. काही संस्था आणि व्यक्ती या कला जतन करण्यासाठी प्रयत्न करत आहेतच ! वाशिंदची सृजन प्रतिष्ठान' 'सारख्या संस्था ठाण्या मुंबईसारख्या शहरांमध्ये या कलांचे सादरीकरण आयोजित करून त्यांना जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करत आहे.**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

## भविष्यवेध



शुक्रवार
०५ डिसेंबर २०२५

**मेष**
तुमचे काम पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित कराल आणि तुमचे बहुतेक प्रयत्न यशस्वी होतील. नवीन वाहन खरेदी करण्याबाबत तुम्ही उत्साहित असाल.

**वृषभ**
तुम्हाला वडिलांच्या सेवांचा फायदा होईल आणि त्यांचे आशीर्वाद तुमच्या आयुष्यातील कोणत्याही चालू समस्या सोडवण्यास मदत करतील.

**मिथुन**
व्यवसायात चांगला नफा मिळेल, ज्यामुळे तुमची स्वप्ने लवकरच पूर्ण होतील. तुमचे वैवाहिक जीवन आज आनंदी राहील आणि तुमची मुलेही मनापासून अभ्यास

**कर्क**
करतील. आज तुम्ही अध्यात्मात थोडा वेळ घालवाल, ज्यामुळे तुमच्या मनाला शांती मिळेल. तुम्हाला दीर्घकाळापासून असलेल्या समस्येतून आराम मिळेल.

**सिंह**
नवीन रोजगाराच्या संधी मिळतील, ज्यामुळे आर्थिक समस्या सोडवण्यास मदत होईल. तुमच्या कायदेशीर बाबी कोणाच्या तरी मदतीने सोडवल्या जातील.

**कन्या**
आज तुम्ही एखादा मोठा वैयक्तिक निर्णय घेऊ शकता. मोठ्या कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळेल ,मुलाखत यशस्वी कराल. शारीरिक समस्येपासून मुक्तता मिळेल.

**तुळ**
तुम्ही एक नवीन टप्पा गाठण्यात यशस्वी व्हाल आणि प्रशंसा केली जाईल. तुमचे कनिष्ठ विद्यार्थी देखील तुमच्याकडून शिकण्याचा प्रयत्न करतील.

**वृश्चिक**
सामाजिक कार्यात सहभागी व्हाल, ज्यामुळे तुमची प्रतिमा उंचावेल. या राशीच्या अविवाहित लोकांना लग्नाचा प्रस्ताव येऊ शकतो. सरकारी योजनेचा लाभ घ्याल.

**धनु**
मालमत्तेत गुंतवणूक करण्याची योजना आखू शकता. व्यापाऱ्याशी करार करू शकता. शांत मनाने आणि गांभीर्याने हाती घेतलेले काम नक्कीच यश देईल.

**मकर**
तुमचे काम पुढे नेण्यासाठी तुम्ही एक नवीन शाखा उघडू शकता. तुम्ही काळाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न कराल, जे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**कुंभ**
व्यवसाय भरभराटीला येईल आणि भौतिक सुखसोयी वाढतील. आरोग्य चांगले राहील आणि उर्जेने परिपूर्ण असाल. मित्रांसोबत बाहेर जाण्याची योजना आखू शकता.

**मिन**
तुम्ही कोणाला उधार दिलेले पैसे तुम्हाला परत मिळतील. विचार न करता कोणत्याही गोष्टीवर प्रतिक्रिया देऊ नका. यामुळे तुमचे नातेसंबंध बिघडू शकतात.

# टिटवाळ्यात वाहतूक विभागाची स्थापना करा

## अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण अंतर्गत येणाऱ्या टिटवाळा पोलीस ठाण्याकरिता वाहतुकीच्या समस्यांचे निवारण होण्याकरिता वाहतूक विभागाची स्थापना होण्याबाबत अपर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल ह्यांना अखिल भारतीय ब्राह्मण महासंघमार्फत टिटवाळा शहर अध्यक्ष ॲड. जितेंद्र जोशी यांनी निवेदन दिले.

मांडा टिटवाळ्यातील विविध वाहतूक समस्याबाबत चर्चा केली असता, कल्याण डोंबिवली महानगरपालिका मार्फत टिटवाळा येथे टोविंग व्हॅन व वाहनतळ उपलब्ध करून देण्याबाबत, ट्रॅफिक वॉर्डनचे मानधन वाढण्याबाबत आयुक्त गोयल यांच्याशी चर्चा करणार असल्याबाबत आश्वासन दिले व सर्वबाबींबाबत त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्याबाबतचा पाठपुरावा मंत्रालय व पोलीस महासंचालककांकडे करणार असल्याचे जोशी यांनी सांगितले.

पोलीस अधिक्षक ठाणे ग्रामीण अंतर्गत सुमारे ११ पोलीस ठाणे येतात. ठाणे ग्रामीणमध्ये सद्यस्थितीत वाहतुक शाखा नसल्याने सदर पोलीस ठाणे असलेल्या ठिकाणच्या परीक्षेत्रामध्ये वाहतुक नियमन करण्याठी वाहतुक विभागामार्फत पुरवला जाणारा वाहतुक पोलीस कर्मचारी नाहीत. त्यामुळे या पोलीस ठाण्यातील कर्मचारी यांनाच परीक्षेत्रातील वाहतुक नियमन, अपघात, वाहतुकीसंबधीचे गुन्हे इत्यादीची जबाबदारी पाडावी लागत असल्याने पोलीस ठाण्यातील अपु-या पोलीस बळावर त्याचा ताण येतो. आवश्यक त्या वेळेस पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना नियमीत पोलीस बंदोबस्ताव्यतीरीक्त वाहतुक नियमन, अपघात व त्यासंबंधीचे गुन्हे हयांचाही अतिरीक्त भार सहन करावा लागतो. त्यामुळे पोलीस अधिक्षक ठाणे ग्रामीण अंतर्गत वाहतुक शाखेची स्थापना होवुन आवश्यक त्या अधिकारी व कर्मचारी वर्गाची नेमणुक करण्याची मागणी ॲड.जितेंद्र जोशी यांनी केली आहे.

# स्कीलहब एज्युकेशनच्या वतीने मोफत इलेक्ट्रिशियन प्रशिक्षण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** स्कीलहब एज्युकेशन येथे पॉलीकॅब इंडिया आणि स्किल इंडिया अंतर्गत इलेक्ट्रिशियन साठी दोन दिवसीय मोफत प्रशिक्षण देण्यात आले. सध्या भारत विकसित देशांच्या दिशेने प्रवास करत असून देशाच्या प्रगतीसाठी युवा वर्गाचा सहभाग महत्त्वाचा आहे. या युवकांना योग्य कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले तर देशाचा विकास होण्यास हातभार लागेल या हेतूने स्कीलहब एज्युकेशनच्या वतीने मोफत प्रशिक्षण देण्यात येत आहे. यामध्ये सहभागी इलेक्ट्रिशियनला स्किल इंडिया आणि पॉलीकॅब इंडिया तर्फे स्किल सर्टिफिकेट आणि पॉलीकॅब इंडिया तर्फे टूल किट आणि टी शर्ट तसेच पॉलीकॅब स्मार्ट कार्ड देण्यात आले. स्किलहब संस्थेचे अध्यक्ष आशिष शिंदे आणि अश्विनी शिंदे यांच्या प्रयत्नातून हा प्रकल्प राबविण्यात आला असून यासाठी पॉलीकॅब इंडिया, स्किल इंडिया तसेच AISECT युनिव्हर्सिटीचे दीपक दायमा यांचे विशेष आभार मानण्यात आले. या कार्यक्रमाचा लाभ कल्याण डोंबिवली तसेच संपूर्ण ठाणे जिल्ह्याला देण्यासाठी प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
## भिवंडी, जि.ठाणे

### जाहीर ई निविदा ०१

खालील कामे करण्याकरीता सक्षम व अनुभवी ठेकेदाराकडुन ई निविदा मागविण्यात येत आहे.

| ई निविदा क्र./ई निविदा फी / कामाचे स्वरुप | ई निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख |
|---|---|
| आस्था./नि.क्र. ०१/२०२५-२६/रु. १००००+GST/- "**कामाचे स्वरूप**: भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या अधिकारक्षेत्रात अग्निशमन, अग्निप्रतिबंधक, आपत्कालीन प्रतिसाद, आपत्ती व्यवस्थापन आणि जीवन-सुरक्षा समर्थन सेवांच्या एकात्मिक वितरणासाठी कुशल, अर्ध-कुशल आणि सहाय्यक मनुष्यबळाचे व्यापक आउटसोर्सिंग." | दि.१६/१२/२०२५ |

सदर ई निविदा मनपाच्या संकेतस्थळ https:/mahatenders.gov.in वर दि.०५/१२/२०२५ पासुन उपलब्ध आहेत. आपल्या ई- निविदावर नमुद केलेल्या तारखेच्या १५.०० वाजेपर्यंत पाठविण्यात याव्यात.

**मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.**

**सही /-**
**उप-आयुक्त (मुख्यालय)**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**जा. क्र. जसंवि/१४९३**
**दि. ०४/१२/२०२५**

# शाळा बंद आंदोलनास ओबीसी शिक्षक महासंघाचा पाठिंबा- अनिल नाचपल्ले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : टीईटी सक्ती तसेच १५ मार्च २०२४ रोजीच्या संच मान्यतेसंदर्भातील शासन निर्णयाविरोधात व इतर काही प्रमुख मागाण्यांसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी ५ डिसेंबर रोजी राज्यातील सर्व शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनास आमचा जाहीर पाठिंबा असेल, अशी भूमिका राष्ट्रीय ओबीसी शिक्षक महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले यांनी मांडली. ते राज्य व जिल्हा कार्यकारिणी सभेत बोलत होते.

ते पुढे म्हणाले, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या टीईटी विषयक अनिवार्यतेच्या निर्णयास अनुसरुन प्राथमिक शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी पुनर्विचार याचिका दाखल करण्यास होत असलेली विलंब प्रकिया, शिक्षण विभागाकडून निकालाचा चुकीचा अर्थ घेऊन सुरु असलेली कार्यवाही यामुळे राज्यातील शिक्षकांत असंतोष निर्माण झाला आहे. १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयामधील संच मान्यतेबाबत लागू केलेल्या जाचक अटींमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अनेक मराठी शाळांचे व पर्यायाने ग्रामीण भागातील सामान्य व बहुजन समाजातील मुले शिक्षणापासून वंचित राहतील. शिक्षकांच्या समायोजनामुळे अनेक शाळा बंद पडण्याची भीती व्यक्त होत आहे. शिक्षक समायोजनाला तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय घेतला असला तरी भविष्यात हजारो शिक्षक अतिरिक्त ठरतील. समायोजनासाठी त्या जिल्ह्यात जागा नसतील तर बाहेरच्या जिल्ह्यात जाण्याशिवाय पर्याय नाही. आदिवासी व डोंगराळ क्षेत्रातील शाळांसाठी विद्यार्थी संख्येची ही अट कमी करावी, अशी मागणी शिक्षक, शिक्षकेत्तर संघटनांच्या वतीने केली आहे. शासनाने मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत निर्णय घ्यावा. या सभेसाठी शिक्षक राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघ महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अध्यक्ष अनिल नाचपल्ले संतोष भोजने राज्य सरचिटणीस अनंत फुलसुंदर जिल्हध्यक्ष सुखदेव भालेकर धनाजी घरत विठ्ठल मेहेत्रे अशोक चव्हाण नानासाहेब कवडे सुधाकर फासे प्रताप माळी खिजर मोरवे सुरेश राऊत शरद वर्हेकर विलास काळे लक्ष्मण वडमिले सचिन रासवे व्यंकटी अटके बबनराव चव्हाण संजय बच्छाव अंगद पवळे मन्मथ तोडकर गोरख आघाव लहु राक्षे कल्याणी वाजे राजेंद्र हजारे प्रमोद आटोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका
## निवडणूक विभाग, मुख्यालय

### निविदा सूचना क्र. ०३/२०२५-२६

कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक विभाग यांचे कार्यालयाकरीता लागणारे, तसेच ईव्हीएम मशीन सिलींग करिता लागणारे साहित्य व स्टेशनरी पुरवठा करणेकरीता इच्छुक अनुभवी ठेकेदार/संस्था/एजन्सी यांच्याकडून बी-२ नमुन्यात दोन लिफाफा पध्दतीने ई निविदा प्रक्रियेद्वारे मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा अनामत रक्कम | निविदा फी (१८% GST सह) | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक विभाग यांचे कार्यालयाकरीता लागणारे, तसेच ईव्हीएम मशीन सिलींग करिता लागणारे साहित्य व स्टेशनरी पुरवठा | रू. ९५,०००/- | रू. ६७२६/- (ना - परतावा) | १ वर्ष |

- इच्छुक ठेकेदारांनी/संस्थांनी/एजन्सी यांनी महाराष्ट्र शासनाच्या निविदेबाबतची संपूर्ण माहिती https:mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून ही निविदा खरेदी करून भरता येईल.
- निविदा अर्जाची विक्री दि. ०५/१२/२०२५ ते दि.११/१२/२०२५ पर्यंत दुपारी ३:०० वाजेपर्यंत राहील.
- निविदा भरण्याचा कालावधी दि. ०५/१२/२०२५ ते दि.११/१२/२०२५ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यत राहील.
- निविदा उघडणे दि. १२/१२/२०२५ रोजी दुपारी ४:०० वाजता नागरी सुविधा केंद्रातील ई टेंडरोग विभाग
- नागरी सुविधा केंद्रातील ई टेंडरींग विभागात उपस्थित निविदाकार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.
- एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखुन ठेवले आहेत,
- अपात्र निविदाधारकांना कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

**सही /-**
**(समर भूमकर)**
**उप आयुक्त (निवडणूक)**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**

**जा. क्र : कडोंमपा/जसंवि/मुका/७५१**
**दिनांक :- ०४/१२/२०२५**

# हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांची 350 वी शहिदी समागम शताब्दी

## राज्यात नांदेड, नागपूर व खारघर, नवी मुंबई (रायगड) येथे ऐतिहासिक कार्यक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी कार्यक्रमानिमित्त महाराष्ट्र शासन व गुरू नानक नाम लेवा संगत (सिख, सिखलकर, बंजारा, लबाना, सिंधी व मोहियाल) समाजामार्फत राज्यात नांदेड, नागपूर व खारघर, नवी मुंबई (रायगड) या तीन ठिकाणी ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.




हा कार्यक्रम तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न असून सीख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी व मोहियाल समाजांचे श्री गुरू तेग बहादूर साहबजी यांच्याशी असलेले ऐतिहासिक नाते संबंधित अधिक दृढ होऊन राष्ट्रीय, सामाजिक व धार्मिक ऐक्य वृध्दींगत करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात येणार आहे.

यानुषंगाने नागपूर येथील जरीपटका पोलीस स्टेशन रोड, सुरेंद्र चंद्र सूत्री ग्राऊंड, खसरा नंबर १६८, नारा येथे दि.7 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 9 ते रात्री 10 या कालावधीत शहिदी समागमचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमास उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची प्रमुख उपस्थिती असणार असून सीख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी व मोहिवाल आणि अन्य सर्व समाजांचे समाजबांधव देखील लाखोंच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

तरी या ऐतिहासिक शहिदी समागम कार्यक्रमास ठाणे जिल्हयातील सीख, सिकलकर, बंजारा, लबाना,सिंधी व मोहियाल या समाजातील सर्व समाजबांधवाना उपस्थित राहण्याकरिता आवाहन करण्यात येत आहे.

# पडघ्यात दत्त जंयती उत्साहात साजरी





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा :** वाढत्या नागरीकरणामुळे सतत चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे विविध आध्यात्मिक कार्यक्रमाव्दारे दत्त जंयती मोठ्या भक्तीभावाने उत्साहात साजरी करण्यात आली.

दिनदयाळ नगर पडघा येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयाच्या प्रांगणात असलेल्या श्री दत्त मंदीरात शिवसेना नेते व जी. पी. पारसीक सहकारी बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी हा जंयतीचा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी अभिषेक, महाआरती, भजन, किर्तन आदी अध्यात्मिक कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी मंदीरात दर्शनासाठी व महाप्रसाद घेण्यासाठी पडघा व परिसरातील विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महीला, उद्योजक, बॅक, महसूल कर्मचारी, नागरीकांनी गर्दी केली होती.यावेळी भिंवडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे शिवसेना (उबाठा) उपनेते विश्वास थळे,ठाणे जिल्हा मजुर फेडरेशनचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक पंडीत पाटील, पुष्पलता पाटील स्थानिक गुन्हे शाखेचे सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे उपस्थित होते.तर पडघा पोलीस ठाण्याच्या प्रांगणात असलेल्या श्री दत्त मंदीरातही जंयती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी सत्यनारायणाची महापुजा, भजन, महाप्रसाद आदी कार्यक्रम घेण्यात आले.यावेळी पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी, नागरीकांनी मंदीरात दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला.




# अनोळखी मृतदेहाची ओळख पटवून मारेकऱ्यांना अटक!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** शहापूर जवळील चेरपोली येथील जंगल परिसरात अर्धवट जळालेल्या व कुजलेल्या अवस्थेत सापडलेल्या अनोळखी मृतदेहाची ओळख पटवून मारेकऱ्यांना अटक करण्यात वासिंद स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 25 नोव्हेंबर रोजी एक अनोळखी पुरुष वय अंदाचे 30 ते 40 यास कोणीतरी अज्ञात आरोपी त्यांनी जीवे ठार मारून त्याचे प्रेत मौजे चेरपोली गावचे हद्दीत नाशिक मुंबई महामार्गा लगत जंगल परिसरात टाकून कमरेपासून वरचा भाग अर्धवट जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. याबाबत चेरपोली गावचे पोलीस पाटील जयतु भेरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून शहापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ.डी.एस. स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांनी घटनास्थळाला भेट देऊन गुन्हा उघडकीस आणणे कामी मार्गदर्शन केले. तर स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. संदीप गीते यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वेगवेगळे पथके तयार करण्यात आली होती.

स्थानिक गुन्हे शाखेच्या वेगवेगळ्या पथकाकडून आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही मनुष्य मिसिंगची पडताळणी करण्यात आली होती परंतु मयत यांचा मृतदेह कुजलेल्या व कमरेच्या वर अर्धवट जळालेल्या स्थितीत असल्याने त्याची ओळख पटवणे कठीण होते गुन्ह्याचा कुठलाही धागा दोरा नसताना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कदम यांना त्यांच्या गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की सदर गुन्ह्यातील मयत इसम यास दिनांक 17 नोव्हेंबर रोजी पहाटेच्या दरम्यान कल्याण येथील फैयाज व त्याचे दोन साथीदार गुलाब अकबर व सिकंदर यांनी रिक्षामध्ये आणून शहापूर भागात गळा आवळून दगडाने ठेचून त्याचा खून करून निघून गेले आहेत अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने याबाबत माहिती घेऊन तांत्रिक विश्लेषणाचे आधारे कल्याण येथील आरोपीत फैयाज जाकीर हुसेन शेख (वय 35), सिकंदर बादशहा मुजावर (वय 35 ) व गुलाम अकबर इत्याहार मौलवी (वय 38 ) यांना ताब्यात घेण्यात आले त्यांच्याकडे कौशल्यपूर्ण विचारपूस केली असता आरोपीत फैय्याज शेख यांनी सांगितले की त्याची मेहुणी हसीना मेहबूब शेख हिचे सांगणे वरून तिचा पती मयत तीपन्ना पूर्ण नाव माहीत नाही रा. सीरु गुंफा जिल्हा बेलारी राज्य कर्नाटक याचा त्याचे सोबतचे साथीदार सिकंदर बादशहा मुजावर व गुलाम अकबर इत्यार मौलवी यांचे मदतीने खून करून पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने डिझेलचे सहाय्याने मृतदेह अर्धवट जाळून मुंबई नाशिक रोडचे मुंबईकडे जाणाऱ्या वाहिनीवर बाजूला जंगलात टाकून दिल्याची त्यांनी कबुली दिल्याने त्याला ताब्यात घेऊन शहापूर पोलीस ठाणे येथे पुढील कारवाई करता हजर करण्यात आले आहे.

शहापूर पोलीस ठाणे यांनी पुढील तपासात कर्नाटक येथून हसीना मेहबूब शेख हीस ताब्यात घेतल्या असून पुढील तपास पोलीस निरीक्षक मुकेश ढगे हे करीत आहेत. सदरची कामगिरी ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ.डी.एस. स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली तर स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. संदीप गीते यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश कदम, रोहन शेलार, दीपेश किनी, भाऊसाहेब गायकवाड पो. हवा.संतोष सुर्वे, हेमंत विभूते, सतीश कोळी, गोविंद कोळी, सुहास सोनवणे, शशिकांत पाटील, आबिद अली सय्यद, पो. शि.योगेश शेळके, स्वप्निल बोडके तसेच सायबर सेलचे पो.हवा. रवींद्र मोरे पो. हवा.दीपक गायकवाड या पथकाने उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

# धार्मिक उपक्रमातून दत्त जयंती साजरी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : श्री साईदत्त सेवा मंडळ व शिवअभिमान प्रतिष्ठान यांचे संयुक्तविद्माने दत्त जयंती निमित्त दर्शन व पालखी सोहळ्याने सावरकर नगर म्हाडा वसाहत अमेय सोसायटी येथून आगमन झाले होते. तसेच पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आले. यावेळी विभागातील रहिवाशांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन घेतले.श्री गुरुदत्त सेवा मंडळ व श्री गुरुदत्त उत्सव कमिटी, इंदिरानगर, वागळे इस्टेट, ठाणे येथे अखंड हरिणाम सप्ताह, संकल्प इंग्लिश हायस्कुल, पाटीलवाडी, ठाणे संचालक राज परब व ज्योती परब यांचे मार्गदर्शनाखाली साई दर्शन व भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आर एस पी संघटनेचे मार्गदर्शक माणिक पाटील, माजी नगरसेवक दिलीप बारटक्के, वाहतुक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ सह परिसरातील नागरिक, पालक व विद्यार्थी यांनी उपस्थित राहून साई भंडारा व दर्शनाचा लाभ घेतला. तसेच श्री दत्त सेवा मंडळ, नारोळीपाडा, रूणवाल नगर, ठाणे येथे साई दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होत.यावेळी दत्त सेवक हेमंत दिवे, दत्त सेवक निलेश भांगे उपस्थित होते.

# मिरारोडच्या जलद स्केटिंग खेळाडूंच्या विक्रमाची गिनिज वर्ल्ड रेकॉर्डकडून नोंद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** बेळगाव मधील शिवगंगा स्टेडियममध्ये पार पडलेल्या सलग 53 तास 100 मिटर अति जलद स्केटिंग चालवण्याचा आगळा वेगळा विक्रम खेळाडूंनी केला आणि विशेष म्हणजे हा विक्रम दोन चाकावर स्केटिंग करुन केला आहे. या मध्ये मिरारोड च्या 33 खेळाडूंनी भाग घेऊन हा पराक्रम केला. या विक्रमाची नोंद गिनिज वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डने घेतली आहे. या स्पर्धेत संपूर्ण देशांमधून 900 खेळाडूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत यश मिळविलेले सर्व खेळाडू संतोष मिश्रा स्पोर्ट्स अकॅडमी मध्ये सराव करतात.



हा विक्रम करणाऱ्यांमध्ये प्रियांश पठारे, रुद्र कदम, श्रवंती सतीश, अन्विता बुटे, ध्रुविका रावराणे, रोशन कोसंबिया, रोनक कोसंबिया, आकृती झा, हिद्या देशमुख, अलिशाबा शेख, दव विश्वकर्मा, अर्जित जोयशी, कियान पटेल, श्रीरक्षा श्रीकृष्ण मूर्ती, सात्विका श्रीकृष्ण मूर्ती, शौर्य गोहिल, हीत राठोड, हमजा खान, उमर खान, मोहम्मद खान, वेदांत शिंदे, श्लोक पाटील, सबा कादर, जियान प्रजापती, जियाना शेट्टी, मालविका बाईंग, हदिबा दुंगे, अजमत दुंगे, आध्या बिहारी, द्विशा झवेरी, हर्षिका रस्तोगी, अथर्व या सर्व खेळाडूंचा समावेश होता. प्रशिक्षक संतोष मिश्रा यांचे या खेळाडूंना मार्गदर्शन लाभले.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** मंगळवार 2 डिसेंबर रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास पेण खोपोली रस्त्यावरील आंबेघर पेट्रोल पंप नजीक एका अज्ञात वाहनाच्या धडकेत पेण मधील 23 वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून त्याचा मित्र गंभीर जखमी झाला असल्याची घटना घडली आहे.

मिळालेल्या माहिती नुसार पेणखोपीली मार्गावर खोपोली बाजू कडून पेण कडे येणाऱ्या TVS जुपिटर गाडी नंबर MH06/ BY 57 23 या दुचाकीला विरुद्ध दिशेने येणाऱ्या आज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार राज वसंत पवार (वय 23, रा. गांगळआळी -पेण) याच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली तर त्याचा जिवलग मित्र करण चंद्रास प्रसाद रा. वडगाव हा गंभीर जखमी झाल्याने त्याला पुढील उपचारा करिता MGM रुग्णालयात पाठवण्यात आले. अपघातस्थळी तरुणाचा रक्तरंजित मृत्यू पाहून स्थानिकांनी हळहळ व्यक्त केली आहे. दरम्यान, पेण-गणपती वाडी येथील हॉटेल सौभाग्यइन समोरील अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच रात्रीच्या सुमारास अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत पुन्हा एकदा राज वसंत पवार या युवकाचा मृत्यू झाल्याने पेणकरांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस चव्हाण हे अधिक तपास करीत आहेत.

# भिवंडीतील दिव्यांगाना पालिकेची सर्वतोपरी मदत

## - आयुक्त अनमोल सागर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी शहरातील दिव्यांगांना महापालिका प्रशासन सर्वतोपरी मदत करणार असून,पालिके कडून सुरू करण्यात आलेल्या दिव्यांग पोर्टलवर दिव्यांग नागरिकांनी आपली माहिती भरून योग्य तो लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेचे आयुक्त अनमोल सागर यांनी केले आहे.




जागतिक दिव्यांग दिनानिमित्ताने भिवंडी शहर महापालिकेच्या मुख्यालय इमारती मध्ये समाज कल्याण विभागा अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या दिव्यांग कार्यालयाच्या व दिव्यांग पोर्टलच्या उद्घाटन आयुक्त सागर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसंगी अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके,नयना ससाणे,उपायुक्त विक्रम दराडे,सहाय्यक आयुक्त शैलेश दोंदे,संगणक प्रमुख मंदार जोशी,दिव्यांग सेवा संस्थेचे अशोक भोईर,नरेश तरेउपस्थित होते.तसेच महापालिका सेवेतील दिव्यांग कर्मचारी व शहरातील दिव्यांग संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

भिवंडी महापालिकेच्या सुरू केलेल्या दिव्यांग पोर्टलच्या माध्यमातून दिव्यांगांना घरबसल्या आपली नोंद करता येणार असून शासनाच्या विविध योजनांची माहिती घेऊन त्यासाठी ऑनलाईन अर्ज करू शकतात या सेवांचा लाभ दिव्यांगाने घ्यावा असे आवाहन आयुक्तांनी यावेळी केले.दिव्यांग हे समाजातील घटक आहे, त्यांना सर्व प्रकारच्या समान संधी उपलब्ध करून देणे, त्यांना मदतीचा हात पुढे करणे, त्यांच्या कामात त्यांना योग्य ती मदत करणे तसेच शासन नियमाप्रमाणे व महानगरपालिकेनी निर्णय घेतल्या प्रमाणे दिव्यांग व्यक्ती यांना लाभ देण्यात येतील अशी माहिती यावेळी आयुक्त सागर यांनी दिली.

प्रसंगी महापालिका सेवेतील उत्कृष्ट काम करणाऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्यांचा उपस्थित अधिकाऱ्यांचे हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी उपस्थित दिव्यांगानी गाणी गायली.हा कार्यक्रम यशस्वी करण्या साठी समाज कल्याण विभागाचे विभाग प्रमुख मिलिंद पळसुले,समीर मुंढे, अमीन अन्सारी,अमोल देसले या कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिव्यांग कर्मचारी श्रीमती अलका मटाले यांनी केले.

# ठाणे महापालिका लोकशाही दिनाचे ०५ जानेवारी रोजी आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ठाणे महापालिकेचा पुढील लोकशाही दिन सोमवार, ०५ जानेवारी, २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी जानेवारी महिन्याच्या लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी म्हणजेच २२ डिसेंबर पूर्वी त्यांचे अर्ज-निवेदने महापालिका भवन, नागरी सुविधा केंद्र येथे दोन प्रतीत सादर करावेत. निवेदन दाखल करताना अर्जदाराने प्रत्येक निवेदना सोबत प्रपत्र-१ (ब) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-१ (ब) नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रसुधा-१०९९/सीआर-२३/९८/१८-अ, दिनांक २६ सप्टेंबर २०१२ नुसार माहे डिसेंबर-२०१२पासून लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांचे निवेदन न स्विकारता, हे निवेदन दोन प्रतीत लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी महापालिका कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्यालयातील या लोकशाही दिनामध्ये, परिमंडळ लोकशाही दिनात ज्या नागरिकांनी आपली निवेदने सादर केलेली आहेत, तसेच ज्या निवेदनावर १ महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच निवेदनांचा स्वीकार करण्यात येईल. नागरिकांनी महापालिका मुख्यालयातील लोकशाही दिनामध्ये निवेदन सादर करताना

## २२ डिसेंबर पूर्वी निवेदन सादर करण्याचे नागरिकांना आवाहन

परिमंडळ लोकशाही दिनामध्ये मिळालेला टोकन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

अर्जदाराने एका अर्जात एकच तक्रार सादर करावी, एकापेक्षा जास्त तक्रारी असलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही. त्याचप्रमाणे आस्थापना विषयक, विविध न्यायालयात, लोकआयुक्त यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या तक्रारी, माहिती अधिकार कक्षेत येणारी प्रकरणे, तसेच राजकीय पक्षाच्या, नगरसेवकांच्या संस्थेच्या लेटरहेडवरील अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे किंवा देण्यात येणार आहे, अशा प्रकरणी केलेला अर्ज, तक्रार वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर असे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

### इयत्ता 9 वी ते 12 वी च्या विद्यार्थीसाठी

# मनशक्ती प्रयोग केंद्राचे विनामूल्य मार्गदर्शन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** इ. 9 वी ते 12 वी च्या परीक्षा आता नजीक येऊन ठेपल्या आहेत. अशावेळी या परीक्षा देणारे विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांच्यावर या परीक्षेचा मोठा ताण येतो. त्यामुळे या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना या महत्वाच्या परीक्षेला सामोरे जाताना धीर मिळावा, त्यांच्या मनावरील ताण हलका व्हावा या दृष्टीकोनातून कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभाग, रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण व रोटरी क्लब ऑफ रिव्हर साईड यांच्या संयुक्त विद्यमाने मनशक्ती प्रयोग केंद्र, लोणावळा यांचे मार्फत 9 वी ते 12 चे विद्यार्थी, त्यांचे पालक व शिक्षक यांच्यासाठी “परीक्षेला सामोरे जातांना” या विषयावर विनामूल्य संवाद / मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन महानगरपालिकेच्या प्र. के. आचार्य अत्रे रंगमंदिर कल्याण (प.) येथे मंगळवार दिनांक 09 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 10:00 ते 12:30 या वेळेत करण्यात आले आहे. या ठिकाणी तद्अनुषंगिक विविध उपाय साहित्याच्या छोट्या प्रदर्शनाचे आयोजन देखील करण्यात येणार आहे. तरी संबंधित विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत करण्यात येत आहे. या विनामूल्य कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी भ्रमणध्वनी क्रमांक 9867929171 या वर संदेश पाठवून आपली नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसांना शासनाकडून मदतीचा हात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** मागिल महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसानी होऊन शेतकरी संकटात सापडला असताना आपल्या प्रपंचाचा गाडा चालावायचा कसा. वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी पेरले गेल्याने आर्थिक, कर्जबाजारी मुळे संकटात सापडलेल्या मुरबाड मधील जायगाव येथील शेतकरी कै. रमेश गणपत देसले यांनी 10नोव्हेंबर 2025 रोजी तननाशक औषध पिऊन आत्महत्या केली होती.



सदर घटनेची दखल घेत मुरबाडचे तहसीलदार अभिजित देशमुख यांनी तालुका स्तरीय कमिटी गठित करून घटनेचा पंचनामा करून तसा प्रस्ताव शासनाकडे मदतीसाठी पाठवला होता.या प्रस्तावाची जिल्हा स्तरीय समितीने निकषात बसवून जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांनी मयत शेतकरी रमेश देसले यांच्या वारसांना एक लाख रुपयाची शासकीय मदत मंजूर केली असून पैकी तीस हजार रूपयाचा धनादेश निवासी नायब तहसीलदार अमोल शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला असून उर्वरित सत्तर हजार रूपये पोस्टाच्या मासीक योजनेत जमा केले असल्याचे परिपत्रकात म्हटले आहे.

तहसीलदार अभिजित देशमुख तसेच तालुका स्तरीय कमीटीने केलेल्या पाठपुराव्यामुळे मयत शेतकऱ्याच्या कुटुंबाला दिलासा मिळाला असल्याने मुरबाड मध्ये शेतकरी वर्गात समाधान व्यक्त होत आहे.

# गव्हाण विद्यालयाकडून किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन कार्यक्रम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज गव्हाण कोपर विद्यालयात किशोरवयीन मुलींसाठी 'हंकल अध्यासिव्ह टेक्नॉलॉजी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' आणि 'इंटरनॅशनल असोसिएशन फॉर ह्यूमन वॅल्यूज'यांचा संयुक्त उपक्रम 1 डिसेंबर ते 3 डिसेंबर 2025 या तीन दिवसांची व्याख्यानमाला आणि मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहाने साजरा करण्यात आला.

किशोरवयीन मुलींसाठी हा खास कार्यक्रम या संस्थेतर्फे आयोजित करण्यात आला. यावेळी सारिका शेलार, वैष्णवी नवले आणि सृष्टी गंभीरराव या तीन महिला कार्यकर्त्यांनी इयत्ता सातवी आणि आठवीच्या वर्गांचे तीन दिवस प्रश्नावली द्वारे अतिशय उत्तमरित्या व्याख्यानमाला घेतली. मासिक पाळी ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे जी प्रत्येक मुलीची पौगंडावस्था सुरू होण्याचे महत्त्वाचे लक्षण आहे. वयाच्या 10 ते 16 वर्षाच्या दरम्यान ही प्रक्रिया सुरू होत असते आणि अशावेळी मुलींमध्ये होणारे बदल, स्वच्छतेचे महत्त्व, मुलींच्या मनात तयार झालेली भीती, संतुलित आहार या सगळया विषयांवर व्यवस्थित विवेचन करण्यात आले. प्रश्नांद्वारे मुलींनी देखील आपल्या शंका कुशंका विचारून त्याचे निरसन करून घेतले. या तीन दिवसाच्या उपक्रमात शेलार मॅडम गंभीरराव मॅडम आणि नवले मॅडम यांनी मुलींना व्यवस्थित मार्गदर्शन केले. या किशोरवयीन मुलीने देखील स्वानुभव सांगून हसत खेळत या उपक्रमात सहभाग नोंदवला. साधारण 133 विद्यार्थिनींनी या उपक्रमाचा लाभ घेतला. शेवटच्या दिवशी म्हणजेच बुधवार दिनांक 3 डिसेंबर 2025 रोजी या संस्थेतर्फे विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅड 2 डेटॉल लिक्विड बॉटल आणि माहितीपत्रक अशा पद्धतीचे किट 133 मुलींना वाटप करण्यात आले.

3 डिसेंबर 2025 रोजी म्हणजेच या कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी हंकल कंपनीतर्फे कंपनी टीम विद्यालयास भेट देण्यात आली होती यावेळी IAHV च्या महाराष्ट्राच्या प्रमुख धडाडीच्या कार्यकर्त्या सुप्रिया पाटील यांनी शेवटच्या दिवशी उत्तम असे व्याख्यान आयोजित करून टीमलाही आमंत्रित केले होते.यावेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांनी या सर्व टीमचे मनःपूर्वक आभार मानले. याप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या सौ. ज्योत्स्ना ठाकूर, पर्यवेक्षिका सौ. शशिकला पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि विशेष आभार हर्षला पाटील यांनी मानले.

# कर्जत, नेरळ रेल्वे स्थानकाच्या नामांतरासाठी खा.सुरेश म्हात्रे मैदानात

## हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी गोमाजी पाटील यांच्या नावासाठी करणार प्रयत्न

## चारही सागरी जिल्ह्यातील भूमिपुत्रांची मागणी; शिष्टमंडळाने घेतली खासदारांची भेट



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या ऐतिहासिक निर्णयानंतर, आता कर्जत आणि नेरळ रेल्वे स्थानकांच्या नामांतराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी या मागणीला पाठिंबा दर्शवत, या नामांतरासाठी संसदेत आणि रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे.

स्वातंत्र्यलढ्यात आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्यात प्राणांची आहुती देणाऱ्या वीर हुतात्म्यांच्या स्मृती जपण्यासाठी हे नामांतर होणे गरजेचे असल्याचे मत चारही सागरी जिल्ह्यातील भूमिपुत्रांनी व्यक्त केले आहे. यामध्ये प्रामुख्याने कर्जत रेल्वे स्थानकाला हुतात्मा भाई कोतवाल यांचे नाव, नेरळ रेल्वे स्थानकाला वीर हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांचे नाव देण्याच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. या नामांतराच्या मागणीसाठी विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आणि भूमिपुत्रांच्या एका शिष्टमंडळाने नुकतीच खासदार सुरेश म्हात्रे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

या शिष्टमंडळात भूमिपुत्र फाऊंडेशन अध्यक्ष सुशांत पाटील, आगरी कोळी युथ फाउंडेशन अध्यक्ष सी.ए. निलेश पाटील, आगरी कोळी मेडिकोज उपाध्यक्ष डॉ. तपन पाटील, आगरी ग्रंथालय चळवळ संस्थापक सर्वेश तरे, चुनाभट्टी आगरी विकास मंडळाचे धीरज कालेकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र म्हात्रे आदींचा समावेश होता. शिष्टमंडळाशी चर्चा करताना खासदार सुरेश म्हात्रे यांनी सांगितले की, "हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी गोमाजी पाटील यांचा त्याग आणि बलिदान समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांचा यथोचित गौरव होण्यासाठी रेल्वे स्थानकांना त्यांचे नाव देणे ही काळाची गरज आहे. नवी मुंबईच्या नामांतर लढ्याप्रमाणेच हा प्रश्नही आपण प्राधान्याने हाती घेऊ आणि प्रशासकीय पातळीवर यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करू."

या आश्वासनामुळे भूमिपुत्रांमध्ये आनंदाचे वातावरण असून, लवकरच या मागणीला मूर्त स्वरूप येईल अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** समग्र शिक्षा – समावेशित शिक्षण अंतर्गत ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षण उपायुक्त सचिन सांगळे, शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे तसेच गटाधिकारी संगीता बामणे यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा शाळा क्र. 69 (URC-1) येथे 3 डिसेंबर 2025 रोजी दिव्यांग दिन दिव्यांग विद्यार्थ्यांच्या विविध क्षमतांचे प्रदर्शन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, वेशभूषा स्पर्धा, वक्तृत्व अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कलाप्रकारांद्वारे दिव्यांग विद्यार्थ्यांनी सर्वांचे मन जिंकले.




यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. समान संधी दिनानिमित्त साजऱ्या या कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत यशस्वीतेची नवी पर्वणी गाठली.

कार्यक्रमासाठी ठाणे मनपा शिक्षण विभागाचे लेखाधिकारी वीर सर, URC-1 व 2 चे समन्वयक पठाण सर, रविंद्र पाटील, समग्र शिक्षा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी देवरे सर, गट क्र. 3 चे गटप्रमुख दळवी सर, CRC उषा फापाळे तसेच शाळा क्र. 115 व 69 चे मुख्याध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमातील सर्व स्पर्धक विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच 10वी व 12वी उत्तीर्ण दिव्यांग विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. गटप्रमुख दळवी सर, पठाण सर व इतर मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल कौतुकाची शब्दफुले अर्पण केली. प्रास्ताविकात समावेशित शिक्षणातील विविध उपक्रमांची माहिती देत दळवी सर व पठाण सर यांनी मनपा व अनुदानित शाळांतील यशस्वी विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे योगदान अधोरेखित केले. कार्यक्रमास 110 विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती. समावेशित शिक्षण URC-1 व 2 मधील सर्व विशेष शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिनाक्षी जाधव व अक्षता लेले यांनी केले.

# समाजकारण- राजकारणातील निस्पृहतेचा आदर्श काळाच्या पडद्याआड

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** महाराष्ट्रातील समाजकारण-राजकारणातील निस्पृहतेचा आदर्श काळाच्या पडद्याआड गेल्याची शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ विचारवंत, समाजसेवक पन्नालाल सुराणा यांना श्रद्धांजली अर्पण केली. शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात,'सुराणा यांनी शेवटच्या श्वासापर्यंत समाजसेवेचा वसा जपला. त्यांनी राजकीय क्षेत्रातही आदर्शवाद जोपासला. शेती, शेतकरी यांच्यासह पर्यावरण रक्षण, जलसंधारण यांच्यासाठी ते अखेरपर्यंत व्रतस्थपणे कार्यरत राहिले. नळदुर्ग येथील 'आपलं घर' बालगृह व शाळेच्या माध्यमातून

### ज्येष्ठ विचारवंत, समाजसेवक पन्नालाल सुराणा यांना श्रद्धांजली

त्यांनी शेकडो अनाथ मुलांच्या आयुष्यात नवसंजीवनी आणली. त्यांची निस्पृह आणि आदर्श अशी जीवनशैली समाजकारण - राजकारणातील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. ज्येष्ठ समाजसेवक पन्नालाल सुराणा यांचे निधन महाराष्ट्राच्या समाजकारण, राजकारण क्षेत्राची हानी आहे, अशी भावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुराणा यांचे कुटुंबीय तसेच कार्यकर्ते यांच्याप्रती संवेदना व्यक्त करीत सर्वांच्या दुःखात सहभागी असल्याचे नमूद केले.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024